**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी**
पो. शिर्डी ता. राहाता जि. अहमदनगर पिन कोड नं. ४२३ १०९
दुरध्वनी क्रं. (०२४२३) २५८७७१/२५८७७२ फॅक्सः २५८७७०

जा.नं.एसएसएस/वशी-खरेदी/ 2066/२०२२
दिनांक- 26 AUG 2022

प्रति,
मे.------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------
------------------------------------------------

**विषयः- कॅन्टीन व प्रसादालयातील भांडी धुणेकामी लिक्वीड सोप खरेदी.. दरपत्रक मागणी..**

आपणास कळविण्यात येते की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेप्रमाणे लिक्वीड सोप दरपत्रकाव्दारे खरेदीकामी दरपत्रके मागविण्यात येत आहे. सदर खरेदीसाठी खालीलप्रमाणे अटी/शर्ती राहतील.

अटी/शर्ती –

१. सदर पत्रासोबत दर भरणेसाठी फॉर्म जोडला आहे. त्यामध्ये दर भरुन खाली आपला शिक्का मारुन त्यावर स्वाक्षरी करावी व हा फॉर्म सीलबंद पाकीटात सादर करावा. तसेच दरपत्रकासोबत अदयावत दुकान नोंदणी दाखला/ स्थानिक स्वराज्य संस्थेचा दाखला/तत्सम शासकीय परवाना, GST नोंदणी दाखला अगर GST Online Registration Receipt, पॅन कार्ड यांच्या झेरॉक्स प्रती जोडाव्यात. सदर मागणी केलेले कागदपत्रांव्यतिरिक्त इतर कागदपत्रे देऊ नये त्यांचा विचार केला जाणार नाही.

२. पुरवठा करावयाचे लिक्वीड सोपचे Specifications हे परिशिष्टामध्ये नमूद करण्यात आलेले आहे. ते विचारात घेऊनच दरपत्रक भरावे. मागणी केलेल्या लिक्वीड सोपचेच दर भरावेत.

३. लिक्वीड सोपचे दर भरतांना GST, GST-TDS, सर्व प्रकारचे शासकीय कर, पॅकिंग व फॉरवर्डींग, वाराई, हमाली खर्च तसेच संस्थानचे प्रसादालय/ कॅन्टीन/ भांडार विभागात पोहोचचे खर्च, हे सर्व खर्च विचारात घेऊन दर नमूद करावेत. कुठलाही खर्च वेगळा आदा केला जाणार नाही.

४. आपले दरपत्रक मंजूर झालेस, विहीत मुदतीत लिक्वीड सोप पुरवठा करावयाची हमी म्हणून एकुण पुरवठा आदेश रकमेच्या ३% इतकी रक्कम सुरक्षा अनामत रक्कम म्हणून संस्थानकडे ठेवावी लागेल. ही सुरक्षा अनामत रक्कम लिक्वीस सोपचा व्यवस्थितरित्या पुरवठा केलेनंतर व पुरवठा कालावधी संपलेनंतर परत केली जाईल. सदर रकमेवर कुठल्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही.

५. दरपत्रक मंजूर झालेवर रू.१००/- मात्रचे स्टॅम्प पेपरवर करारनामा नोटरी करून देणे बंधनकारक राहील. करारनाम्याची नोटरी फी आपणास आदा करावी लागेल.

६. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर त्यानंतरही संस्थानचे गरजेनुसार मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा लिक्वीडसोपची मागणी संस्थानकडून झाल्यास तीचा पुरवठा मान्य दरानेच करणे दरपत्रकधारकावर बंधनकारक राहील.

७. परिशिष्टात नमूद केलेप्रमाणे लिक्वीड सोपचे दरपत्रक सादर करावे व त्याप्रमाणेच माल पुरविण्याची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादाराची राहील. पुरवठा आदेशाप्रमाणे माल नसल्यास तो स्वीकारला जाणार नाही. तो तात्काळ परत घेऊन जाणे पुरवठादारावर बंधनकारक राहील. तो न नेल्यास त्याची नासधुस झाल्यास त्यास संस्थान जबाबदार राहणार नाही.

८. शिर्डी संस्थान हे धर्मदाय ट्रस्ट असल्याने दरात जास्तीत जास्त सवलत देणेस विनंती.

९. सिलबंद पाकिटातील दरपत्रक शिर्डी येथे संस्थानच्या आवक विभागात विहीत वेळेत पोहचणे आवश्यक आहे. दरपत्रक देतांना "लिक्वीस सोप पुरविणेचे दरपत्रक- (खरेदी विभाग)" असा पाकिटावर स्पष्ट उल्लेख असावा.

१०. कोणतेही दरपत्रक स्विकारणे अथवा नाकारणे अथवा सर्व दरपत्रके नाकारणे याबाबतचा अधिकार संस्थान प्रशासनाने राखून ठेवला आहे. त्याची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक नाही.

११. लिक्वीड सोप पुरविणेचा कालावधी पुरवठा आदेश दिलेपासून एक वर्षभर असल्याने प्रसादालय व कॅन्टीन विभागाचे मागणीनुसार ०४ टप्प्याने ५० लिटरच्या ड्रम/बॅरल सह खरेदी करण्यात येईल. त्याप्रमाणे पुरवठाधारकास वर्षभर लिक्वीड सोपचा पुरवठा करावा लागेल. लिक्वीड सोपचा पुरवठा करण्यासाठी वापरलेले प्लास्टीक ड्रम/ बॅरल परत मिळणार नाहीत.

१२. लिक्वीड सोपचा पुरवठा दुरध्वनी/ईमेलव्दारे कळविलेनुसार दिलेले शेड्यूलप्रमाणे वेळेत पुरवठा करावा लागेल.

१३. पुरवठा करीत असलेले लिक्वीड सोप संस्थानकडून Randomly Sample घेऊन स्वीकारले जाते. तथापी सदर माल स्विकारलेनंतरही एखादा ड्रम/ बॅरल, लॉट खराब आढळल्यास तो स्वखर्चाने बदलून द्यावा लागेल.

१४. पुरविलेले लिक्वीड सोपची श्री साईबाबा प्रसादालय/ कॅन्टीन विभागांमार्फत गरजेनुसार लॅब तपासणी करण्यात येईल. या तपासणीमध्ये पुरविलेल्या लिक्वीड सोपचा रिपोर्ट मागणी केलेल्या Standards नुसार नसल्यास सदर माल बदलून द्यावा लागेल. त्यादरम्यान संस्थानला बाजाराभावाने माल विकत घ्यावा लागल्यास जादा आलेल्या खर्चाची रक्कम अधिक पुरविलेल्या मालाच्या किंमतीच्या २ ते ५ टक्के दंड देय असलेल्या कुठल्याही बील रकमेतून/सुरक्षा अनामत रकमेतून वसूल करण्यात येईल.

१५. आपण पुरविलेले लिक्वीड सोप संस्थानने नाकारले व त्यामुळे पुढील कालावधीसाठी संस्थानला बाजारभावाने दुसरीकडून लिक्वीड सोप खरेदी करावी लागल्यास त्यासाठी जादा आलेल्या खर्चाची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अथवा संस्थानकडून देय असलेल्या इतर बिलातूनही वसूल केली जाईल.

१६. शासन नियमानुसार आवश्यक असलेल्या कर कपाती बिलातून करण्यात येतील.

१७. पुरवठा आदेशातील लिक्वीड सोप विहीत मागणी केलेल्या मुदतीत पुरविले नाही तर खालीलप्रमाणे दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

| | |
|---|---|
| अ) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपची किंमत रु.२.०० लाखापेक्षा कमी असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त १० % पर्यंत |
| ब) पुरवठा न केलेल्या लिक्वीड सोपची किंमत रु.२.०० लाख किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास | प्रती आठवडा ०.५० % दराने जास्तीत जास्त ५ % पर्यंत |

१८. लिक्वीड सोप पुरवठा न झाल्यास अगर कमी दर्जाचे, वेगळ्याच कंपनीचे वा योग्य प्रतीचे नसल्यामुळे ते नाकारले गेल्यास संस्थानची अडचण होऊ नये म्हणून संस्थानला बाजारभावाने आवश्यक तितके किंवा दिलेल्या आदेशा इतके लिक्वीड सोप दुसरीकडून खरेदी करण्याची मुभा राहील. अशा खरेदी केलेल्या लिक्वीड सोपसाठी जादा लागलेल्या रकमेची (फरकाची) भरपाई पुरवठाधारकाने श्री साईबाबा संस्थानला करुन दयावयाची आहे. सदरची भरपाई सुरक्षा अनामत रकमेतून अगर पुर्वीच्या/नंतरच्या आलेल्या बिलातून वसुल करण्याचा अधिकार संस्थान प्रशासनाला राहील.

१९. दरपत्रकातील मंजूर दराने लिक्वीड सोप पुरवठा करणे बंधनकारक आहे. मंजूर दरामध्ये कोणत्याही कारणास्तव दरवाढ मागण्याचा अधिकार पुरवठाधारकास असणार नाही अथवा अशा प्रकारची दरवाढ दिली जाणार नाही. पुरवठाधारकाने लिक्वीड सोप पुरवठा करावयाचे नाकारल्यास अथवा पुरवठा न केल्यास संस्थानला बाजारभावाने अथवा फेरनिविदा मागणी करुन खरेदी करावी लागल्यास जादा येणा-या खर्चाची नुकसान भरपाई पुरवठाधारकाकडून वसुल केली जाईल. तसेच याबाबत संस्थान प्रशासनाने घेतलेले निर्णयाप्रमाणे उचित कारवाई करण्यात येईल. याबाबत पुरवठाधारकाची कुठलीही तक्रार ऐकुन घेतली जाणार नाही.

२०. पुरवठा कालावधीमध्ये एखादी आपत्ती/ नैसर्गिक आपत्तीमुळे (अशी आपत्ती की जी दरपत्रकधारकाच्या नियंत्रणाबाहेर असेल. उदा.युद्ध, अतिवृष्टी, दुष्काळ, अपहरण, घातपात, रोगराई, संप, स्फोट, टाळेबंदी, भूकंप वगैरे) पुरवठाधारक लिक्वीड सोपचा पुरवठा करु शकला नाही व तसे पुरवठाधारकाने संस्थानला त्वरीत लेखी कळविले तर याबाबत योग्य तो निर्णय परिस्थितीनुरुप घेण्यात येईल. तथापि सदर तरतूद ही फक्त पुरवठा करण्यात झालेला विलंब क्षमापित करण्याइतपत मर्यादित असून उपरोक्त परिस्थितीत मंजूर दरापेक्षा बाजारात भाववाढ झाल्यास त्यासाठी लागू राहणार नाही. पुरवठादाराला बाजारात भाववाढ झाली तरीही मंजूर दराने पुरवठा करणे बंधनकारक आहे. पुरवठादाराने पुरवठा न केल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येईल अगर संस्थान प्रशासन जो निर्णय घेईल तो पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. याबाबत संबंधिताची कुठलीही तक्रार ऐकून घेतली जाणार नाही.

२१. सदर दरपत्रकाचा वैधता कालावधी दरपत्रकाच्या अंतिम तारखेपासून १८० दिवसांचा राहील.

२२. कोणतीही दरपत्रके स्विकारणे/नाकारणे किंवा सर्व दरपत्रके नाकारणेचा हक्क संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. त्याबाबतची कारणे देणे संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही.

२३. दरपत्रकधारकांनी सादर केलेल्या दराचा Itemwise तुलनात्मक विचार करण्यात येईल.

२४. पुरवठा केलेले लिक्वीड सोप प्रसादालय/कॅन्टीन विभागाने स्विकारलेनंतर त्यांचे अभिप्रायानुसार साधारण ३० दिवसात बील आदा करण्याचा प्रयत्न राहिल. सदर पुरवठयापोटी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेकडून आगाऊ रक्कम (अॅडव्हान्स) दिली जाणार नाही.

२५. संस्थानची सदर मागणी ही अंदाजित असल्यामुळे पुरवठा कालावधीत अगर पुरवठा कालावधी संपल्यानंतरही पुढील वर्षाची खरेदी संबंधीत प्रक्रिया पूर्ण होईपावेतो गरजेनुसार मंजूर केलेले परिमाणाइतका अगर मंजूर केलेल्या परिमाणापेक्षा २५ टक्केपर्यंत जादा लिक्वीड सोपची मागणी संस्थानकडून झाल्यास त्या लिक्वीड सोपचा पुरवठा मान्य दरानेच करणे पुरवठाधारकावर बंधनकारक राहील. तसेच पुरवठा आदेशामध्ये नमूद केलेले परिमाणाइतके सर्व लिक्वीड सोप खरेदी करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

२६. पुरवठादाराने लिक्वीड सोपचा पुरवठा करावयाचे नाकारल्यास तसेच संस्थान प्रशासनाने नमूद केलेले कुठल्याही अटी-शर्तींचा भंग झाल्यास सुरक्षा अनामत रक्कम जप्त करण्यात येऊन सदर पुरवठाधारकाचे नांव पुढील ३ वर्षासाठी काळया यादीत समावेश केले जाईल. याबाबत संस्थान प्रशासन जो निर्णय घेतील तो आपणावर बंधनकारक राहील. याबाबत पुरवठाधारकाची काहीही तक्रार चालणार नाही.

२७. सदरील व्यवहाराबाबत वाद निर्माण झाल्यास तो राहाता/कोपरगांव कोर्टाचे न्यायकक्षेत राहील.

२८. सदरचे दरपत्रक फॉर्म downloading साठी संस्थानचे संकेतस्थळ www.sai.org.in वर उपलब्ध असुन अंतिम दि. ०५ / ०९ /२०२२ पर्यंत मुदत देण्यात येत आहे. याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी व विहीत मुदतीत संस्थानला सीलबंद पाकीटात सदरचे दरपत्रक मिळेल अशा पध्दतीने सादर करावेत. उशिरा आलेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही.

२९. उपरोक्त शर्ती व अटीत काही बदल, सुधारणा करणे वा जादा अटी/शर्ती विहीत करण्याचा अधिकार श्री साईबाबा संस्थान प्रशासनाने राखून ठेवलेला आहे. दरपत्रकधारकाची कोणतीही अट/अटी श्री साईबाबा संस्थान प्रशासनावर बंधनकारक राहणार नाही, अशी दरपत्रके विचारात घेतली जाणार नाहीत.

(भाग्यश्री बानायत, भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी
श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी

## SHRI SAIBABA SANSTHAN TRUST, SHIRDI

### ANNEXURE FOR Requirement of the Liquid soap

| Sr.No. | Description | Quantity | Unit | Rate Per Litre | Total Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | **Liquid Soap -**<br>Neutral Grade - (PH-7.8 TO 8.5)<br>क्षमता- १ लिटर लिक्वीड सोपमध्ये १० लिटर पाणी<br>For Dish Washing Machine and Manual Dish Wash<br>**Packing:- 50 Litres Plastic Drum**<br>**To Be supplied in 4 Quarters** | 25,800 | Litres | | |
| TOTAL AMOUNT IN Rs. | | | | | |

**SIGNATURE AND STAMP SEAL OF SUPPLIER**